शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचा परिसर तंबाखूमुक्त करण्याबाबतचे सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-१११९/(प्र.क्र.६६/१४)/समन्वय, दि.०५ फेब्रुवारी,२०१८ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ - 46
दि. 23 MAR 2018

विद्यापीठ ... आवक विभाग
दि. -9 MAR 2018
69

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाविद्यालये /शैक्षणिक संस्था यांचा परिसर तंबाखू मुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११११/(प्र.क्र.६६/१४)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०५ फेब्रुवारी, २०१८.

वाचा -

१) केंद्र शासनाचा सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३.
२) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१११११/प्र.क्र.६६/१४/समन्वय, दि.०७/०३/२०१५.
३) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१११११/प्र.क्र.६६/१४/समन्वय, दि.२४/०६/२०१५.

---

शासन परिपत्रक -

तंबाखूचा वाढता वापर आणि त्याच्या दुष्परिणामांमुळे जागतिक आरोग्य संघटनेने तंबाखूला जागतिक समस्या म्हणून घोषित केले आहे. जगामध्ये प्रत्येक वर्षी ५० लक्ष व भारतात अंदाजे १० लक्ष लोक तंबाखूमुळे होणाऱ्या आजारांनी मृत्यूमुखी पडतात. हृदयरोग, फुफ्फुसाचे आजार तसेच इतर असंसर्गजन्य रोगांचे कारण तंबाखूचा वापर आहे. लहान वयात तंबाखूची सवय लागल्याने ही सवय सोडणे कठीण जाते व यामुळे विविध असंसर्गजन्य आजार होण्याचा धोका असतो. शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे वाढते प्रमाण हा चिंतेचा विषय आहे म्हणून शाळा / महाविद्यालय परिसर तंबाखू मुक्त परिसर करण्यासाठी १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्री होत असल्यास संबंधित शाळा / महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांनी पोलीसांकडे तक्रार करावी.

२. तंबाखू वापरावर प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा Cigarettes and Other Tobacco Products ( Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution ) Act. 2003 केला आहे.

Shivaji University, Kolhapur
3838
Date 16/03/2018

शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थी तंबाखूच्या व्यसनांच्या विळख्यात सापडू नयेत यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेत तंबाखू नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३. तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ ची महत्वाची कलमे खालीलप्रमाणे आहेत. :-

कलम ४ - शैक्षणिक संस्थांसह सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी आहे.

कलम ६ (अ) - तंबाखू विक्री लहान मुलांना आणि लहान मुलांकडून करून घेण्यास बंदी आहे.

कलम ६ (ब) - शैक्षणिक संस्थांपासून १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे व तसे शाळेच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक आहे.

वरील नियमांचे पालन न केल्यास रु. २००/- पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील प्रत्येक महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेला तंबाखू वापरावर नियंत्रण करण्यासाठी संदर्भ क्र.३ येथील परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील विद्यापीठे / महाविद्यालये यांचा परिसर तंबाखू मुक्त करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. :-

१) प्रत्येक महाविद्यालय /शैक्षणिक संस्थेत धुम्रपान बंदीबाबत सूचना फलक लावण्यात यावा.

२) धुम्रपान करताना अथवा तंबाखू खाताना दिसल्यास कोणाकडे तक्रार करावी याबाबतच्या माहितीचा फलक लावण्यात यावा.

३) महाविद्यालयांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंदीबाबतचे फलक प्रवेशद्वारावर लावण्यात यावेत.

४) महाविद्यालयाच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू /तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्यास संस्थेच्या प्रमुखाने पोलीस स्टेशनला तक्रार करावी.

५) संस्था प्रमुखांनी संस्थेच्या आवाराची तपासणी करुन, संस्थेच्या आवारात कुठलेही तंबाखूजन्य पदार्थ उपलब्ध नाहीत याबाबतचा अहवाल संबंधित शिक्षण संचालकांना पाठवावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०६१६००५४५३०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सिद्धार्थ खरात
( सह सचिव, महाराष्ट्र शासन )

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री गृह ( शहरे ) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता ( विधानसभा / विधानपरिषद ), विधान भवन, मुंबई.
६. अ. मु. स. ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व संचालकांना विनंती की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणावे.
१२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण.
१३. सर्व विभागीय शिक्षण सह संचालक, तंत्र शिक्षण.
१४. सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. डॉ. रुपेश महाजन, सल्लागार, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१७. निवडनस्ती.